# मिरा भाईंदर महानगरपालिका

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग
जा.क्र. मनपा/वृ.प्रा/मिरारोड/५६२/२०२१-२२
दि. ०७/०३/२०२२

प्रती,
सिस्टम ॲनालिस्ट
नागरी सुविधा केंद्र
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :- जाहिर सुचना प्रसिध्द करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वृक्षप्राधिकरण विभागाच्या सोबत जोडलेल्या जाहिर सुचना महापालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

**सोबत :- जाहिर सुचना**

(संजय शिंदे)
उप. आयुक्त (वृक्ष प्राधिकरण)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## वृक्ष प्राधिकरण विभाग

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे – 401101. दुरध्वनी क्र. 28192828, 28181183

जा.क्र. मनपा/वृ.प्रा/मिरारोड/५६८/२०२१-२२
दि.०५/०३/२०२२

**// जाहिर सुचना //**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 1975, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण व संवर्धन नियम 2009 मधील तरतुदीनुसार आणि मा. मुंबई उच्च न्यायालय जनहित याचिका क्र. 119/2017 मधील सूचित आदेशानुसार तसेच मा. मुंबई उच्च न्यायालय जनहित याचिका क्र. 93/2009 मध्ये विहित केलेल्या निकषांनुसार वृक्षप्राधिकरणात नामनिर्देशित कमाल दोन सदस्यांची नेमणूक करण्यासाठी खालील पात्रताधारकांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | अटीशर्ती | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|
| १ | वृक्षप्राधिकरणावर अशासकीय संस्थेचा प्रतिनिधी म्हणून नियुक्त होण्यास नामनिर्देशित व्यक्ती शासनाच्या सामाजिक वनीकरण विभागाकडील नोंदणीकृत अशासकीय संस्थेचा सक्रीय सदस्य असेल. | १. अशासकीय संस्थेची सामाजिक वनिकरण विभागाकडील नोंदणीचे अदयावत प्रमाणपत्र.<br>२. संस्थेचे ध्येय व उददेश.<br>३. नोंदणीकृत अशासकीय संस्थेचा सक्रिय सदस्य असल्याचा दाखला. |
| २ | तसेच तिला वृक्षलागवड व संवर्धन आणि वृक्ष संरक्षण इ. मध्ये रुची असेल. | १. शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, किंवा नागरी स्वराज्य संस्था इत्यादी ठिकाणी वृक्षारोपन,जतन व संवर्धन इत्यादी ठिकाणी केलेल्या कामाचे सत्यप्रतीसह प्रमाणपत्र सादर करणे. |
| ३ | वृक्षांचे रोपण, जतन, पुनर्रोपण किंवा पर्यावरण संवर्धन, क्षेत्रातील विशेष ज्ञान व किमान दहा वर्षांचा समृद्ध अनुभव असावा. | १. शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, किंवा नागरी स्वराज्य संस्था इत्यादी ठिकाणी वृक्षारोपन,जतन व संवर्धन इत्यादी क्षेत्रात किमान १० वर्षाचा समृदध अनुभव असलेल्या कामाचे सत्यप्रतीसह प्रमाणपत्र सादर करणे.<br>२. कृषी/वन/उद्यान विदया शास्त्राची पदवी किंवा पदवीका असणाऱ्यांना प्राधान्य. सोबत प्रमाणपत्र जोडणे. |
| टिप :- १. एका अशासकीय संस्थेचा एकच प्रतिनिधी नामनिर्देशित होण्यास पात्र राहील.<br>२. उमेदवार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हदिदतील रहिवासी असल्यास प्राधान्य. | | |

उपरोक्त पात्रता असणाऱ्या प्रतिनिधींनी संपूर्ण माहितीसह आवश्यक कागदपत्रांसह अर्ज मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. अर्जदार यांनी पात्रता धारण करत असल्याबाबत अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले असणे बंधनकारक राहील. सदर कागदपत्रांच्या सत्यप्रतींसह अर्ज बंद लिफाफा मध्ये **तळ मजला, प्रभाग समिती क्र. ०४, कै. विलासराव देशमुख भवन, जांगीड इन्क्लेव्ह, कनकीया, मिरारोड (पु.)** येथे कार्यालयीन वेळेत सदरची सूचना प्रसिद्ध् झाल्याच्या दिनांकापासून दि. २५ / ०३ /२०२२ दुपारी ३.०० वाजेपर्यंत कार्यालयीन कामकाजाचे दिवसांत सादर करण्यात यावेत. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या तसेच अपुरी पात्रता-कागदपत्रे सादर केलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. अपात्र ठरणाऱ्या तसेच पात्र होऊनही नामनिर्देशित होणार नाहीत अशा उमेदवाराशी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदरची सूचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

ठिकाण : भाईंदर
दिनांक :    /    /२०२२

**(संजय शिंदे)**
**उप. आयुक्त (वृक्ष प्राधिकरण)**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**